महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४२, ४४३, ४५०
ई-मेल-desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२१/ ९०२ दिनांक : 23 SEP 2021

परिपत्रक

विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम / पाळी बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

संदर्भ : या संचालनालयाचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२१/७७४, दि.२६.०८.२०२१

संदर्भीन परिपत्रकान्वये संस्था व पाठ्यक्रम बदलासाठी विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी दिनांक ३०.०९.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. दिनांक ३०.०९.२०२१ नंतर तसेच अपुर्ण अर्ज किंवा आवश्यक प्रमाणपत्र / कागदपत्रांविना सादर केलेल्या अर्जांबाबत काहीही न कळविता असे अर्ज दप्तरी दाखल तथा नस्तीबध्द करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्र शिक्षण, म. रा. मुंबई

प्रत : मा. सचिव, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी सादर

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थाना अग्रेषित करून संस्थेच्या संकेतस्थळी व सूचना फलकावर प्रसिध्द करण्यास कळविण्यात यावे.
२. प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी पदवी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संस्थेच्या संकेतस्थळी व सूचना फलकावर प्रसिध्द करून पुढील उचित कार्यवाही कालमर्यादेत करण्यात यावी.
३. मा. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (पात्रता शाखा)
४. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई
५. कार्यासन क्रमांक २, निवड नस्तीस.

---

पृष्ठांकन क्र. विकाऔ/शिक्षण/२०२१/ 2790
दिनांक:- 27 SEP 2021

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये या कार्यालयाच्या अधिपत्याखालील विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत सोबतच्या परिपत्रकात दिलेल्या सुचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सोबत :- संदर्भिय परिपत्रक

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत : - या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४२, ४४३, ४५०
ई-मेल-desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२१/९०३ दिनांक : 23 SEP 2021

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,
मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर

२) प्राचार्य,सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र,
वास्तुशास्त्र,एचएमसीटी इ. पदवी महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य

विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम / पाळी बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

संदर्भ : या संचालनालयाचे पत्र क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२१/९०२, दि.२३.०९.२०२१

विषयांकीत संदर्भीन पत्र पहावे.

विद्यार्थ्यांना संस्था व पाठ्यक्रम बदलास अर्ज करण्यासाठीच्या संदर्भीन परिपत्रकान्वये निर्धारीत केलेला सुधारीत दि.३०.०९.२०२१ निर्धारीत करण्यात आला आहे. यास्तव संदर्भीन पत्रासोबतचे प्रपत्र अधिक्रमीत करून सोबत जोडलेल्या प्रपत्रात नमूद केल्यानुसार तीन स्तरावर मान्यता देण्याची कार्यवाही कालमर्यादेत करण्यात यावी. सदर कार्यवाही करतांना सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये व संबंधित संस्थांचे प्राचार्य यांनी नियमांचे काटेकोर पालन करावे.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, माहितीसाठी सादर

१) मा. सचिव, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग,फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी सादर
२) मा. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (पात्रता शाखा)
३) कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई
४) कार्यासन क्रमांक २, निवड नस्तीस.

# प्रपत्र - अ

| अ. क्र. | तपशील | कार्यवाही | कालमर्यादा | कार्यवाही प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | अ) संस्था अंतर्गत शाखा बदल /पाळी बदल | संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी प्रथम वर्षाच्या किंवा प्रथम व व्दितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार शाखा बदलाची कार्यवाही करावी | दि.०१/१०/२०२१ किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांक यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | संबंधित संस्थेचे प्राचार्य |
| | ब) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल | प्राप्त विनंती अर्जानुसार विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या आधारे विहित नमुन्यातील अर्जावर आवश्यक ती माहिती भरून आवश्यक दस्तावेजासह त्यांचेकडील रिक्त जागांची माहिती व ना-हरकत प्रमाणपत्रासह प्रस्ताव अभ्यासक्रम निहाय सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांना सोबतच्या Annexure B च्या विहित नमुन्यातील माहितीसह Email द्वारे पाठविण्यात यावेत. | दि.०४/१०/२०२१ किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांकाच्या ३ दिवस अगोदर यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | संस्था बदलीने प्रवेश देणा-या संस्थेचे प्राचार्य |
| २ | इ) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल (विद्यापीठांतर्गत) | विना अनुदानित संस्थाकडून संस्था बदलाबाबत विद्यापीठा अंतर्गत प्राप्त अर्जाच्या (१—ब नुसार) अनुषंगाने सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात असणा-या संस्था बदलाचे प्रकरणी मान्यतेची कार्यवाही करावी | दि.०८/१०/२०२१ किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांक यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये |
| | ब) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल (विद्यापीठ बदल) | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे १-ब नुसार प्राप्त होणा-या विद्यापीठाबाहेरील प्रस्तावांची दि. २४.०४.२०१७ च्या शासन अधिसूचनेतील नियम क्रमांक १६ मधील तरतदूीनुसार छाननी / तपासणी करून सोबतच्या Annexure B च्या विहित नमुन्यातील माहितीसह मान्यतेसाठी एकत्रित प्रस्ताव तंत्र शिक्षण संचालनालयास ईमेल द्वारे पाठविण्यात यावेत. | दि.०५/१०/२०२१ किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रि की, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांकाच्या ३ दिवस अगोदर यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये |
| ३ | संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल (विद्यापीठ बदल) | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे २-ब नुसार प्राप्त होणा-या अर्जावर तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत मान्यतेची कार्यवाही करण्यात येईल. | दि.०८/१०/२०२१ किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांक यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | संचालक, तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई |